MHAH250010692024

## दिवाणी दावा क्रं.४०४/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश

## (शिवाजी घंगाळे व इ. वि. सर्जेराव घंगाळे व इ.)

वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ प्रमाणे प्रतिवादींनी दावा मिळकती मध्ये अतिक्रमण करुन आंब्याचे झाडाचे उत्पन्न घेऊ नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याकामी दिलेला आहे.

२. वादींच्या अर्जातील कथन की, दावा मिळकत गट नं.८० ही वादी यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची असुन वादी हे सदर मिळकतीत त्यांचे वाडवडिलापासुन वहिवाट करुन पिके घेत आहेत. दावा मिळकत गट नं.७७ ही प्रतिवादी नं.१ ते १६ यांचे मालकीची असुन ते सदर मिळकतीमध्ये वहिवाट करुन पिके घेत आहेत. वादींच्या मिळकतींच्या पश्चिम बाजुस लगत प्रतिवादी यांची गट नं.७७ ही मिळकत आहे. प्रतिवादी यांच्या गट नं.७७ मध्ये दक्षिणोत्तर वाटण्या असुन वादी यांचे गट नं.८० चे शेजारी बाजुस गट नं.७७ मध्ये प्रतिवादी नं.१ यांचे क्षेत्र आहे.

३. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी नं.३ हे सन १९७२ पासुन सरकारी नोकरीत होते. तसेच वादी नं.१ व २ हे सुध्दा नोकरी करीत असल्याने त्यांचे मुळ गावी येणे कमी होते. तसेच वादी यांचे आईवडील हे वादी नं.३ यांच्याकडेच राहात होते. वादी यांचे वडील सन १९७४ मध्ये मयत झालेले असुन वादीची आई सन १९८० मध्ये मयत झालेली होती. वादी नं.१ ते ३ यांचे गट नं.८० मध्ये एकत्रीत क्षेत्र आहे. त्यामध्ये अदयाप पावेतो सरस निरस मानाने वाटप झालेली नाही. वादी यांनी सदरची मिळकत कोणालाही वहिवाट करावयास दिली नव्हती. वादीने सदरची मिळकत ही पडीक ठेवलेली होती. प्रतिवादी नं.१ हा त्याची सासुरवाडी माळकुप येथे किराणा दुकान चालवित होता. परंतु त्याचे वडील मात्र हिवरे कोर्डा येथेच राहात होते. माळकुप ते हिवरे कोर्डा हे अंतर हे फक्त ३ कि.मी. चे असल्याने प्रतिवादी नं.१ हा दररोज जावुन येवुन हिवरे कोर्डा येथील शेती पाहात होता. वादी हे मौजे हिवरे कोर्डा येथे राहात नसल्याचा गैरफायदा प्रतिवादी नं.१ यांनी

घेवुन वादी यांच्या गट नं.८० मध्ये पश्चिम बाजुने हळुहळु अतिक्रमण करुन सुमारे ०.०२आर क्षेत्रावर अतिक्रमण केले. वादीच्या गट नं.८० मध्ये एक आंब्याचे झाड होते. ते झाड सुध्दा प्रतिवादी नं.१ ने अतिक्रमण करुन त्याचे ताब्यात घेतले.

४. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हे सन २०१४ मध्ये नवरात्रात गावी आले असता त्यांना प्रतिवादी नं.१ यांनी त्यांचे मालकीचे गट नं.८० मध्ये पश्चिमेकडील बाजुने अतिक्रमण केल्याची बाब लक्षात आली. म्हणुन वादी यांनी सदरची बाब प्रतिवादी नं.१ ला विचारली असता त्यांनी वादीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे वादी यांनी सन २०१६ मध्ये उपअधिक्षक भुमि अभिलेखक, पारनेर यांच्याकडे मोजणी कामी अर्ज दिला असता दि.३०/०६/२०१६ रोजी उपअधिक्षक भुमि अभिलेख, पारनेर यांनी भुकरमापक यांचेमार्फत समक्ष हजर राहुन मोजणी केली. त्यावेळी प्रतिवादी नं.१ हा स्वतः व वादी हे हजर होते. भुकरमापक यांनी सदर गट नं.७७ व ८० या दोन्ही गटाची मोजणी करुन प्रतिवादी नं.१ यांनी गट नं.७७ मधुन वादी यांच्या गट नं.८० मध्ये पश्चिम बाजुने अतिक्रमण केल्याचे सांगितले व त्याप्रमाणे पंचनामा करुन पंचाच्या, वादी यांच्या सहया घेतल्या व त्या प्रमाणे नकाशा तयार करुन त्यामध्ये प्रतिवादी नं.१ यांनी गट न.७७ मधुन वादींच्या गट नं.८० मध्ये ०.०२आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दाखविले आहे.

५. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक ०३/०३/२०२४ रोजी वादी नं.३ यांनी प्रतिवादीची भेट घेवुन त्यांनी मिळकतीमध्ये केलेले ०२आर क्षेत्राचे अतिक्रमण काढुन घेण्याबाबत व आंब्याचे पिक देण्याबाबत विनंती केली असता प्रतिवादी म्हणाला की, तुला एकदा सांगितले आहे, पुन्हा जमीनीची व आंब्याची भाषा केली तर माझे नातेवाईकांना जमवुन तुझा बेत पाहिल व पुन्हा गावामध्ये येवु देणार नाही अशी दमबाजीची भाषा वापरली. त्यामुळे प्रतिवादी नं.१ यांनी वादीच्या गट नं.८० मध्ये ०.०२आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचा गैरफायदा घेवुन सदर क्षेत्रामध्ये वहिवाट करु नये व प्रतिवादी नं.१ हे वादीच्या गट नं.८० मधील असलेल्या आंब्याचे झाड अतिक्रमण करुन स्वतःचे कब्जात घेवुन सदर आंब्याचे पिक घेवु नये असा निरंतर ताकीद हुकुम मिळण्यासाठीही वादी यांनी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

६.		वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादीला प्रायमा फेसी केस आहे. बॅलन्स ऑफ कन्व्हीनियंस वादींच्या बाजुने आहे. सदर दाव्याचा गुणावगुणावर निकाल लागण्यास बराचसा कालावधी लागणार आहे. तो पावेतो प्रतिवादी हे वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करुन आंब्याचे पिक काढुन घेतील. तसे झाले तर वादी यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम देण्याची विनंती केली आहे.

७.		वादीच्या दाव्यास व अर्जास प्रतिवादी नं.१ हजर होऊन त्यांचे लेखी म्हणणे नि.१८ वर दाखल केले आहे. त्यांनी आक्षेप घेतला आहे की, सदरील दावा मिळकतीपैकी दावा मिळकत गट नं.७७ आणि गट नं.७९ या शेत मिळकती प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित शेत मिळकती असुन सदरील शेत मिळकतींचे दरम्यान प्रतिवादी यांचे दरम्यान उद्यापपावेतो सरस निरस मानाने दिशा ठरवुन वाटप विभाजन झालेले नाही, वादी आणि प्रतिवादी यांचे दरम्यान असणा–या शेत मिळकती दरम्यान सुमारे दिड ते दोन मिटरचे बांध आहेत. वादी व प्रतिवादी हे त्यांना असणा–या शेत मिळकतीमध्ये स्वतंत्रामध्ये उत्पन्न घेत आहेत. वादी व प्रतिवादी यांची ज्याच्या त्याच्या शेत मिळकतीमध्ये स्वतंत्रामध्ये वहिवाट आहे. सदरील वहिवाटी आणि दरम्यानचे बांध हे सुमारे ४०–५० वर्षापासुन कायम आहेत. वादी, प्रतिवादी यांना एकमेकांच्या मिळकतीमध्ये येण्याचा अथवा अतिक्रमण करण्याचा केव्हाही प्रश्न उद्भवला नव्हता.

८.		प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदरील दावा वादी यांनी प्रतिवादी यांना विश्वासात न घेता अथवा कोणत्याही प्रकारे विचारणा न करता मोजणी अधिकारी यांना हाताशी धरुन मोजणी दारामार्फत मोजणी करवुन प्रतिवादी यांनी अतिक्रमण केलेले नसतांना देखील प्रतिवादी यांनी अतिक्रमण केल्याचे नकाशात नमुद करवुन घेतलेले आहे. तसेच वादी यांनी मोजणीदारामार्फत नोटीसाही या प्रतिवादी यांना दिलेल्या नव्हत्या. तसेच या प्रतिवादींचे समोर कोणत्याही प्रकारे जबाब घेतलेले नाहीत. वास्तविक पाहता वादी प्रतिवादी यांच्या दरम्यान असणा–या मिळकती दरम्यान पुर्वीपासुनच भक्कम बाधं बंधिस्ती असल्यामुळे प्रतिवादी यांना वादी यांचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण करण्याचा काही एक प्रश्नच उद्भवत नाही आणि प्रतिवादी यांनी वादी यांचे क्षेत्रामध्ये केव्हाही अतिक्रमण केलेले नव्हते व

आजही नाही. वादी हे त्यांच्या क्षेत्रामध्ये ज्वारी, मुग, हरबरा अशी पिके घेत असतात, परंतु वादी हे प्रतिवादी यांना विनाकारण कोणत्या ना कोणत्या कारणाने त्रास देत असल्यामुळे प्रतिवादी यांनी त्यांच्या दावा मिळकतीमध्ये या वर्षी कोणतेही पिक घेतलेले नाही. सदर दाव्यामध्ये वादी यांनी दाखल केलेला मोजणी नकाशा वादी यांनी मोजणीदार यांना हाताशी धरुन तयार केलेला आहे. प्रत्यक्षात वादी यांनी सदरील गटाबाबत कोणत्याही प्रकारची मोजणी मोजणीदारामार्फत केलेली नाही.

९. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी नं. १ हे गरीब कुटुंबातील असुन त्यांना कुणाचाही आधार नाही, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे आंब्याचे झाड हे प्रतिवादी यांचे हद्दीत असल्यामुळे सदरील आंब्याच्या झाडावर प्रतिवादी यांनी केव्हाही अतिक्रमण केलेले नाही. तसेच सदरील प्रतिवादी यांनी केव्हाही वादी यांच्या दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुने ०.०२आर क्षेत्राचे अतिक्रमण केलेले नाही. तसेच वादी यांनी सदरील अतिक्रमण काढुन घेण्याबाबत प्रतिवादी यांनी केव्हाही विचारणा केलेली नाही आणि प्रतिवादी नं.१ यांनी वादींना केव्हाही दमबाजीची भाषा वापरली नाही. त्यामुळे वादी यांची कोणतीही विनंती मान्य करण्यात येऊ नये तसेच वादी यांच्या मागणीप्रमाणे वादी यांना प्रतिवादी यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारचा मनाई हुकुम देण्यात येऊ नये तसा तो दिल्यास वादी हे सदरील बेकायदेशीर मनाई हुकुमाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांच्या मिळकतीमधुन बेदखल करण्याचा दृष्ट प्रयत्न करतील आणि तसे झाल्यास प्रतिवादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे अतोनात नुकसान होईल. वादींच्या दाव्यास कुठलाही लोकस स्टॅण्डी नाही बॅलन्स आॅफ कन्व्हेनिअन्स देखील प्रतिवादींच्याच बाजुन आहे. वादींचा दावा हा विनाकारण असुन वादींच्या दाव्यास काही एक कारण घडलेले नाही. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

१०. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन झाले आहेत व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह दिले आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादींच्या बाजूने सुकृतदर्शनी प्रकरण असल्याचे वादी | **नकारार्थी** |

सिध्द करतात का?

| | | |
|---|---|---|
| २. | अनुकुलतेचा कल वादींच्या बाजुने आहे काय? | **नकारार्थी** |
| ३. | तात्पुरता मनाई हुकुम नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल असे वादी सिध्द करतात का? | **नकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज नामंजुर करण्यात आला.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता</u>**

**११.** उपरोक्त वाद प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीतपणे चर्चे करिता घेतले आहेत.

**१२.** वादींनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठयर्थ मौजे हिवरे कोर्डा येथील गट क्र. ८० च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत, गट नं.८० चा फ्लॉट रिपोर्ट, फेरफार नं.२०३१ ची छायांकीत प्रत, मोजणी नकाशाची छायांकीत प्रत, दोन फोटो, गट नं.७७ चा ७/१२ उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केलेले आहे. याउलट प्रतिवादीने कुठलाही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

**१३.** वादींचे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. आर कुलकर्णी यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी क्र.७ वर लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. सदर युक्तिवादात त्यांनी दाव्यातील व अर्जातील कथनाचा पुनःउच्चार केला आहे. प्रतिवादी नं.१ चे विद्वान विधीज्ञ श्री. ए. एन. रोहोकले यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या लेखी म्हणण्यातील कथनांचा पुनःउच्चार केला.

**१४.** अर्जाचे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. पटलावर दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे दावा मिळकत गट क्र.८० ही मुळ पुरुष केशव नामा घंगाळे यांच्या नावे असल्याचे दिसुन येते. त्यांच्या मृत्यु नंतर दावा मिळकत ही वादींच्या नावे लागल्याचे दिसुन येते. सदर बाब फेरफार क्र.२०३१ चे अवलोकन केल्यावर स्पष्ट होते. अभिलेखावर दाखल मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता सदर मोजणी नकाशा हा गट

क्र.७६ च्या मोजणीबाबत तयार केला असल्याचे दिसुन येते.

**१५.** अभिलेखावर दाखल कागदपत्रांनुसार दावा मिळकत ही वादींची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. वादींच्या कथनानुसार प्रतिवादीने त्यांच्या मिळकतीत अतिक्रमण करुन आंब्याचे झाड स्वतःच्या क्षेत्रात दर्शविले आहे. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादींनी प्रतिवादीने सदर आंब्याच्या झाडाचा उपभोग घेऊ नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मागितला आहे. त्यामुळे प्रथमदर्शणी सदर झाडाचा ताबा हा प्रतिवादीकडे असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर झाड हे प्रतिवादीने वादींच्या क्षेत्रावर अतिक्रमण करुन स्वतःच्या क्षेत्रात घेतले आहे किंवा नाही हे वादींना पुराव्यानिशी सिध्द करावे लागेल. सदर अतिक्रमणाबाबत वादींनी अभिलेखावर दाखल केलेला नकाशा हा दावा मिळकतीचा नाही. वादींनी गट क्र.७६ बाबत याच न्यायालयामध्ये दुसरा नियमित दिवाणी दावा क्रमांक ४०८/२०२४ हा दाखल केला आहे. त्या दाव्यामध्ये प्रस्तुतच्या गट क्र.८० या मिळकतीचा नकाशा दाखल केल्याचे दिसुन येते. सदर दाव्यात दाखल नकाशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये कुठेही आंब्याचे झाड असल्याबाबत नमुद केल्याचे दिसुन येत नाही.

**१६.** तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी वादींनी सकृतदर्शनी दावा त्याच्या बाजूने आहे हे दाखवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे न्यायाचा कल देखील वादींच्या बाजूने आहे व तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे हे सिध्द करणे क्रमप्राप्त आहे.

**१७.** वादींना तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता त्यांच्या बाजुने प्रथमदर्शणी केस आहे हे सिध्द करणे क्रमप्राप्त आहे. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर झाड हे नेमक्या वादींच्या क्षेत्रात आहे किंवा नाही हे प्रथमदर्शणी दिसुन येत नाही. सदर बाब ही वादींना योग्य तो पुरावा देऊन सिध्द करावी लागेल. त्यामुळे उपलब्ध पुराव्या आधारे प्रतिवादीला सदर झाडाचा उपभोग घेण्यापासुन या स्टेजला रोखता येणार नाही. त्यामुळे वादींच्या बाजुने प्रथमदर्शणी केस आहे असे म्हणता येणार नाही. तसेच न्यायाचा समतोल हा देखील वादींच्या बाजुने नाही. वादींच्या कथनानुसार सदर अतिक्रमण

हे सन २०१४ साली झाले असुन मागील १० वर्षापासुन प्रतिवादी त्या झाडाचा उपभोग घेत आहे. त्यामुळे वादी मागतात त्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम दिल्यास वादींपेक्षा जास्त प्रतिवादीचे नुकसान होईल. त्यामुळे वादींनी मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुमाची दाद मिळण्याकरीता ते पात्र नाहीत या निष्कर्षा पर्यंत मी येत आहे. सबब, वरील कारणमिमांसेवरुन वादी हे तुर्तातुर्त मनाई हुकुमाची दाद मिळण्यास अपात्र ठरत असल्याने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर  नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u>**

**१८.** वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी  नकारार्थी दिले असल्यामुळे मुद्दा क्र.०४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

KANAKDANDE SHRIHARI
Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.02.07 16:52:40 +0530

(एस.आर.कनकदंडे)

दिनांकः– ०७/०२/२०२६ **२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर**

**पारनेर, जि.अहमदनगर.**